दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

विचारपूर्वक केलेली कृती नेहमी फळ देणारी असते.

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २९ जुले २०२५ | अंक २२० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# महाराष्ट्रात सरकारी बाबू सावधान, सोशल मीडिया वापरण्याआधी नियम, नाहीतर नोकरी येईल धोक्यात

सध्या फेसबुक, एक्स (ट्विटर), इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲप हे सोशल मिडिया ॲप्स आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. पण महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांनो, जरा थांबा! कारण आता या माध्यमांवर काहीही पोस्ट करण्यापूर्वी तुम्हाला दहा वेळा विचार करावा लागणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने (GAD) नुकतेच सोशल मीडिया वापरासंदर्भात अतिशय कठोर आणि महत्त्वाचे दिशानिर्देश जारी केले आहेत. यामुळे यापुढे कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला सरकारवर टीका करणे किंवा धोरणांबद्दल नकारात्मक टिप्पणी करणे महागात पडणार आहे.

**शासनाने महत्त्वाचे पाऊल**

आज सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम असले तरी, त्याचा गैरवापरही तितक्याच वेगाने सुरु आहे. गोपनीय माहिती लीक होणे, चुकीची माहिती पसरवणे आणि राजकीय टिप्पण्या पोस्ट करणे यांसारख्या गोष्टी सर्रास घडताना दिसतात. आता याबद्दल एक शासनाने एक महत्त्वपूर्ण आदेश काढला आहे. या शासकीय आदेशात स्पष्टपणे नमूद केले आहे की, हे प्रकार सध्याच्या सरकारी सेवा नियमांचे थेट उल्लंघन करतात. त्यामुळे, या गैरवापराला आळा घालण्यासाठी शासनाने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.



## नियमांचा भंग केल्यास काय होणार?

जर कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याने या नवीन नियमांचे उल्लंघन केले म्हणजे सरकारी धोरणे, कोणतीही राजकीय घटना किंवा व्यक्तीबद्दल सोशल मीडियावर नकारात्मक टिप्पणी केली, तर त्याच्यावर त्वरित कारवाई केली जाईल. ही कारवाई महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त आणि अपील) नियम, १९७९ नुसार करण्यात येईल. विशेष म्हणजे, हे नियम फक्त नियमित कर्मचाऱ्यांसाठी नाहीत, तर प्रतिनियुक्तीवर असलेले, कंत्राटी कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील आणि सरकारशी संलग्न संस्थांमधील कर्मचाऱ्यांनाही लागू असतील. त्यामुळे, आता कोणालाही मी कंत्राटी कर्मचारी आहे असं म्हणता येणार नाही.

## स्व महादेव मुंडे कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी जरांगे पाटील मैदानात
# बीडमध्ये १ ऑगस्ट रोजी सर्व धर्मीय सर्वपक्षीय बैठक

बीड दि. प्रतिनिधी : परळी शहरातील व्यापारी महादेव मुंडे यांची अतिशय क्रूरतेने हत्या झाल्यानंतर पोलिसांना अजूनही महादेव मुंडे यांचे मारेकरी सापडत नाहीत. न्याय मिळावा यासाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरीताई मुंडे यांचा गेल्या अनेक दिवसापासून लढा सुरूच आहे मात्र मुंडे कुटुंबीयांना अजून न्याय मिळालाच नाही. आता म नोज दादा जरांगे पाटील आणि मराठा समाज हेच आपल्याला न्याय मिळवून देऊ शकतात या विश्वासाने ज्ञानेश्वरीताई मुंडे यांनी मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांना हाक दिल्यानंतर म नोज दादा जरांगे पाटील आणि सकल मराठा समाज ज्ञानेश्वरीताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहिला आहे. स्व. म हादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मि ळवून देण्यासाठी बीड जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात मोठे आंदोलन उभे राहणार आहे. स्व. महादेव मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता बीड शहरातील कॅनॉल रोड येथील राम कृष्ण लॉन्स येथे बीड जिल्हा सकळ मराठा समाजाच्या वतीने सर्व धर्मीय व सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीला मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी स्व. महादेव मुंडे यांचे कुटुंब सुद्धा उपस्थित असणार आहे. या बैठकीम ध्ये आंदोलनाची पुढील दिशा ठरणारा असून महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा होणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आजी माजी खासदार, आमदार, मंत्री, राज्यमंत्री,
जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकारी नागरिक यांनी मोठ्या संख्येने या आयोजित बैठकीला उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज बीड जिल्हा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## वरिष्ठ महाविद्यालयातील ५५०० सहायक प्राध्यापकांची भरती लवकरच

लातूर । प्रतिनिधी महाराष्ट्र राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील अनेक वर्षापासून रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापकांची ५५०० पदे व शिक्षकेतर कर्मचा-यांचे २९०० पदेलवकरच भरली जाणार असून त्याचा शासन निर्णय २० ऑगस्टपर्यंत निघेल, अशी माहिती मराठवाड्याची शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी दिली. सदरील पदे भरतीसाठी मुक्टा संघटना जुक्टा संघटना व राष्ट्रवादी शिक्षक संघटनेने आमदार विक्रम काळे, राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केला होता. शेवटी सर्वांच्या प्रयत्नाला यश आले असून लवकर राज्यामध्ये सहाय्यक प्राध्यापकांची भरती होणार आहे. प्रा. अशोक मोठे, प्राचार्य महादेव गव्हाणे, प्रा. अंकुश कदम, जुक्टाचे शिवराम सूर्यवंशी, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष मदन धुमाळ, प्रा. अंकुश नाडे, तानाजी पाटील, दयानंद कांबळे, प्राचार्य शिवा रोडगे, कैलास क्षीसारगर, दयानंद झांबरे, प्रा. ज्ञानेश्वर चामे आदींनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आह

## माजलगाव शहर पोलिसांनी मोकळ्या जागेत तिरट नावाच्या जुगार खेळणाऱ्या ईसमावर केली कारवाई....

माजलगाव प्रतिनिधी... दिं .28.07.2025. पोलीस ठाणे माजलगाव शहर हद्दीमध्ये मंजरथ रोड नवीन कब्रस्तानच्या बाजूला मोकळ्या जागेत काही ईसम गोलाकार बसून तिरट नावाचे जुगार खेळत आहे अशी माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा टाकला असता आरोपी नामे (1)अनिल आश्रुबा चौगुले रा. जुना बाजार माजलगाव (2)अक्षय नरेंद्र मेंडके रा. तानाजी नगर माजलगाव (3)नागेश लक्ष्मण काजळे रा. चिंचगव्हाण माजलगाव(4) गणेश लक्ष्मण शिंदे रा. वडार वाडा माजलगाव (5)हारून रेहमान आतार रा. झेंडा चौक बागवान गल्ली माजलगाव (6)शेख सोफियान संयुम रा.चिचगव्हण माजलगाव हे तिरट नावाचा जुगार खेळताना मिळून आले आहेत व त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम दोन मोटरसायकल तीन मोबाईल असा एकूण 1.44.100./- मुद्देमाल जप्त केला आहे व पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे गुरन. 291/2025 कलम -12(अ ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे सदरची कारवाई नवनीत कावत पोलीस अधिक्षक बीड श्रीमती चेतना तिडके मॅडम अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई निरज राजगुरू उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ. पोउपनि.संदीप राठोड. पो.अ. घोडके पो.अ.नवले पो.अ. गवळी. पो.अ. पोकळे.यांनी केली आहे

## श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथील श्री भगवान सोमेश्वर महादेव मंदिरामध्यो महाआरती भाविकांना केळीचा महा प्रसाद वाटप करण्यात आला

बीड प्रतिनिधी. महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण वातावरण मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथील प्रसिद्ध असलेल्या सर्व भाविकांच्या नवसाला पावणाऱ्या अशा श्री भगवान सोमेश्वर महादेवाच्या मंदिरामध्ये आज शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये देव देश आणि धर्म या ब्रीद वाक्याला अनुसरून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा सोमेश्वर मंदिराचे ट्रस्टी विश्वस्त मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील सह एडवोकेट गोविंद शिराळे पाटील सह सर्व विश्वस्त टीमच्या वतीने श्री सोमेश्वर भगवान श्री



महादेवाला महाआरती करण्यात आली या महाआरतीनंतर येथे शेकडो भाविक भक्त आज पहिला सोमवार असल्यामुळे श्री भगवान सोमेश्वर महादेवाच्या दिव्य स्वरूपाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांना केळी या महा प्रसादाचे वाटप देखील भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या वतीने करण्यात आले आणि सर्व शेकडो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये भगवान श्री सोमेश्वराला प्रार्थना करण्यात आले की बीड जिल्ह्याच्या भूमी कन्या श्रीमती पंकजाताई मुंडे यांना उदंड आयुष्य लाभो अशी सर्वांच्या वतीने श्री ईश्वराकडे प्रार्थना करण्यात आली यावेळी येथे उपस्थित असलेले सर्व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक पत्रकार वकील डॉक्टर्स इंजिनिअर तसेच सर्व भाविक भक्त शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

## नागोबा गल्ली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह दुरुस्त करा : जोगदंड

बीड । प्रतिनिधी नागोबा गल्ली पेठ, बीड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा असून त्या सभागृहाची नगर पालिकेने दुरुस्ती व साफसफाई १५ वर्षापासून केलेले नसून सभागृहामध्ये दरवाजे खिडक्या व पत्र्याचे छत खराब झालेले असून त्यामुळे सभागृहामध्ये तेथे गोर गरीब लोकांच विवाह सोहळे व सांस्कृतिक कार्यक्रम करत होते. परंतु सभागृहाची दुर अवस्थता झाल्यामुळे तेथील शुभ कार्य बंद झालेली आहेत. व सभागृहाला पत्र्याचे छत असून ते खराब झाल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही. व सभागृहाच्या परिसरामध्ये अतिक्रम केलेले आहे व सभागृहाजवळ गहाण व सांडपाणी तेथे साठवत असून तेथील सभागृह दूरअवस्था झालेली आहे. निवेदन देते प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, प्रभाकर चंदने, विलास जोगदंड, अक्षय कोकाटे, भैय्या वाघमारे, सनी जोगदंड आदि उपस्थित होते. सभागृहामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे छत कोसळून विटंबना व नुकसान होण्याची शक्यता आहे. व तसेच पुतळ्याचे नुकसान व जिवीत हाणी झाल्यास त्यास सर्वस्वी नगर परिषद बीड जबाबदार राहील याची दक्षता घेण्यात यावी. सभागृहाची व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची दुरुस्ती न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) बीड शहर पदाधिकारी व नागरिक घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अंदोलन करण्यात येईल व काही अनुचित प्रकार घडला तर याला सर्वस्वी जबाबदार नगरपालिका प्रशासन असेल असे निवेदन रिपाई चे शहराध्यक्ष अविनाश जोगदंड यांच्यासह विशिष्ट मंडळांनी यांनी दिले आहेत.

## धानोरा रोड व अंकुश नगर रोडसाठी आंदोलन, उपोषणाची वर्षपूर्ती २९ जुलै रोजी खड्ड्यात लोटांगण आंदोलन

बीड (प्रतिनिधी) गेल्या 10 वर्षापासून शहरातील नगर रोड ते पालवन चौक असलेल्या अगदी पावणे दोन किलोमीटर रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. त्याचबरोबर मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर मुख्य रस्ता, विठ्ठल चौक पर्यंत हा रस्ता गेल्या 15 वर्षापासुन केलाच नाही. परंतु याकडे नगरपरिषद तसेच जिल्हा प्रशासन दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे येणाऱ्या 29 जुलै तारखेला धानोरा रोडच्या मुख्य रस्त्यामधील खड्यामध्ये लोटांगण आंदोलन केले जाणार आहे. त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण नूतनीकरण व कॉंक्रिटीकरण करण्याच्यादृष्टीने नगरपरिषदेने सुवर्ण जयंती नगरोत्थान मधून प्रस्ताव दाखल केला आहे याला तांत्रिक मान्यता मिळाली असून प्रशासकीय मान्यता बाकी आहे असे असले तरी या रस्त्याच्या कामात भूसंपादन



प्रक्रियेमुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, महिला, वृद्ध नागरिक, व्यापारी, वाहन धारकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर या धानोरा रोडलगत डॉ. मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर, आगलावे ईस्टेट, विठ्ठल चौक हा 3 कि.मी. चा मुख्य रस्ता आहे. 15 गेल्या वर्षापासुन केलाच नाही, त्यामुळे येथील रहिवाशीयांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यासाठी अनेक आंदोलने, उपोषणे करण्यात आली आहेत. व या आंदोलनाला उपोषणाला एक वर्ष पूर्ण झाले. परंतु नगरपरिषद व जिल्हा प्रशासन या रस्त्याच्या प्रश्ना बाबत गांभीर्याने घेत नाही तसेच लोकशाही मार्गाने आमरण उपोषण सुरू असताना नगरपरिषद प्रशासनाने रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे लेखी आश्वासन दिले होते मात्र ते देखील पूर्ण केले नाही त्यानंतरही अनेक वेळा निवेदनाद्वारे कारवाईची मागणी करण्यात आली. मात्र याकडे वेळोवेळी जाणुन बुजुन दुर्लक्ष करण्यात येत असल्याने दि.29 जुलै 2025 रोजी सकाळी ११ वाजता आंदोलन, उपोषणाची वर्षपूर्ती म्हणून धानोरा रोडच्या मुख्य रस्त्यामधील खड्ड्यामध्ये लोटांगण आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन नितेश उपाध्ये, साहस आदोडे व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २९ जुलै २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज दहावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणण्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही ( सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल ) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. क्षेपणास्त्र विकास कार्यातील अग्नी या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रेक्षपण केल्यावर त्यांचे जगभर कौतूक झाले. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना ते पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार बनले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रसुख म्हणून अजु्न हा एम. बी. टी ( मेन बॅटल टँक ) रणगाडा व लाईट कॉबॅट एअरक्राफ्ट ( एलसीए ) यांच्या निर्मितीत महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली १९९८ साली भारताने पोखरण येथे यशस्वी अणूचाचणी केली. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०–२०, इग्निटटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथी निमित्ताने विनम्र अभिवादन

# बालरंगभूमी परिषदेचा शिवरायांच्या गौरवशाली इतिहासावर आधारित इतिहास महाराष्ट्राचा उपक्रम

## बीडमध्ये १२ ऑगस्टला प्राथमिक फेरी; अंतिम फेरी मुंबईत २३ व २४ ऑगस्टला

बीड (प्रतिनिधी) दि.२८ : छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास लहान मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने बालरंगभूमी परिषदेने 'इतिहास महाराष्ट्राचा' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शिवजन्मोत्सव ते शिवराज्याभिषेक या कालखंडातील महत्त्वाच्या घटनांचे सादरीकरण नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला आणि इतर कला प्रकारांद्वारे करण्यात येणार आहे. या उपक्रमाची प्राथमिक फेरी बीडमध्ये दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून अंतिम फेरी २३ व २४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत पार पडणार आहे. ही माहिती बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, बीड जिल्हाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर आणि प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल यांनी दिली. या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्रातील सर्व शाखा स्तरावर करण्यात आले आहे. स्पर्धा एकल आणि समूह अशा दोन गटांमध्ये होणार आहे. एकल गटामध्ये वयोगट १ व २ मधून प्रत्येकी प्रथम व द्वितीय क्रमांकाचे स्पर्धक, तसेच समूह गटातून दोन संघ अंतिम फेरीसाठी निवडले जाणार आहेत. एकल गट १: स्पर्धकांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराज किंवा त्याकाळातील अन्य व्यक्तिमत्त्वांचे सादरीकरण ५ मिनिटांत करावे. एकल गट २ व समूह गट: शिवजन्मोत्सव ते राज्याभिषेक दरम्यानच्या घटनांचे १० मिनिटांपर्यंत सादरीकरण अपेक्षित असून, यामध्ये ४ ते ८ बालकलावंतांचा सहभाग असावा. विविध कला प्रकारांचा समन्वय असावा. प्रत्येक सादरीकरणासाठी वाद्यवृंद, नेपथ्य, रंगभूषा आणि वेशभूषेची जबाबदारी संबंधित स्पर्धकांची असेल. आयोजकांकडून फक्त ध्वनी व प्रकाशयोजनेची सुविधा दिली जाईल. स्पर्धेचे निकाल अंतिम व बंधनकारक




असतील. प्राथमिक व अंतिम फेरीतील सर्व सहभागी आणि विजेत्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख ८ ऑगस्ट असून, अधिकाधिक शालेय विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेचे बीड जिल्हा पदाधिकारी डॉ. संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, विलास सोनवणे, अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवनीकर, दीपक जमदाडे, दुष्यंता रामटेके, नामदेव साळुंखे, सुरेश साळुंखे, विजय राख, राहुल सोनवणे, असलम शेख, अमित गाढे, बालासाहेब कांबळे, रोहित पुराणिक, दीपक गिरी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विजय राख: 9833345809, अमित गाढे: 8888966792, दीपक गिरी: 8177924756, रोहित पुराणिक: 9325212199, सिद्धार्थ अग्रवाल: 9765085331, सुमित गायकवाड: 7028027852 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# नागपंचमी व नाभिक समाज सहसंबंध





(नागपंचमी विशेष लेख)

नाभिक समाज ही संपूर्ण भारतामध्ये सर्वत्र असणारी ही जात. न्हावी, न्हावकी, सेन, हजाम, वारिक, क्षीरक, नापित, कारागीर, सन्मुख, वालंद, घायजो, मटको, कैलासी, नायिक, म्हाली, वावडी, चसकी, खवास, भंडारी, मंगल अशा अनेक नावांनी ओळखला जाणारा हा समाज -भगवान शंकर,विष्णू आणि ब्रह्मा यांच्यानंतर या सृष्टीमध्ये मनुष्यरुपाने जन्म घेणारी पहिली व्यक्ती म्हणजे नाभिक

संत शिरोमणी सेना महाराजांची पुण्यतिथी,वीर शिवा काशिद यांचा स्मृतिदिन आणि नागपंचमी हे तीन दिवस या समाजासाठी अधिक महत्त्वाचे आहेत. पण कधी विचार केलाय का, नागपंचमी या सणाचा आणि नाभिक समाजाचा संबंध काय आहे ? नाभिक समाज का साजरी करतो नागपंचमी ? चला याबाबत थोडी माहिती घेऊ या, -

नाभिक समाज आणि नागपंचमी यातील सहसंबंध पाहण्यासाठी 'नाभिक पुराण' हा ग्रंथ पाहावा लागतो. हा अतिप्राचीन ग्रंथ असून १८ पुराणांतील चौथ्या क्रमांकाचे पुराण मानले जाते. परंतु त्याच्या लेखनकाळाविषयी अधिक माहिती मिळत नाही. त्यामुळे 'विश्वनाथ भारती' यांनी १६३८ मध्ये लिहिलेल्या नाभिक पुराण या ग्रंथाचाच येथे आधार घ्यावा लागतो. हा ग्रंथ चौदा अध्यायाचा असून यामध्ये मराठी ओवी संख्या १५६६. मिश्र मुसलमानी भाषेतील ओव्या ५५ आणि कुराणातील १३ आयते आहेत.

पहिल्या अध्यायामध्येच नाभिकाची उत्पत्ती कथा सांगितली आहे. ती अशी,जेव्हा सृष्टी निर्माण झाली तेव्हा सृष्टीचे रूप म्हणजे जिकडे तिकडे अंधार आणि सर्वत्र पाणीच पाणी होते. या अंधारात आणि पाण्यात एक अव्यक्त परमात्मा वास करीत होता. तोच आदिपुरुष म्हणजे भगवान शंकर. शंकराने आपल्या हृदयापासून मायेच्या पोटी विष्णूला जन्म दिला आणि त्याच्या कानात सहा अक्षरांचा वेदमंत्र सांगितला. त्या वेदमंत्राचा ध्वनी विष्णूच्या नाभीशी जाऊन स्थिरावला. शंकराच्या आदेशानुसार या नाभीतून कमळाच्या आठ पाकळ्यातून चतुरानन ब्रह्माचा जन्म झाला. सृष्टीच्या निर्मितीसाठी आपल्या माया सामर्थ्यांनी आदिपुरुषाने विष्णुच्या साहाय्याने ब्रह्माला म्हणजेच ब्रह्मदेवाला जन्म दिला. परंतु ब्रह्मा हा ब्राह्मण असल्याने त्याचे मौजीबंधन केल्याशिवाय त्याची शुध्दी होणार नव्हती. म्हणून विष्णूने ब्रह्माची मुंज करण्याची कल्पना भगवान शंकराकडे मांडली. कारण नंतर ब्रह्माच सर्व वेद सांभाळणार होता. आणि त्यांच्याचकरवी सृष्टीची निर्मिती होणार होती. परंतु शंकर आणि विष्णू या दोघांपुढे मोठा प्रश्न होता की, ब्रह्माची मुंज करणार कोण ? तेव्हा शंकराला आपल्या गळ्यातील शेषनागाची आठवण झाली. शंकराने शेषनागाला आपल्या नाभीतून मनुष्य रुपात जन्म घेण्यास सांगितले. शंकरापासून दूर व्हावे लागेल, या भावनेने शेषनागाने त्यास अगोदर विरोध केला. तेव्हा भगवान शंकर शेषनागाला म्हणाले, श्रावण महिन्यातील शुध्द पंचमीला तुझी घराघरात पुजा होईल. तुला लोक नवस बोलतील, बाल,प्रौढ,नारी तुझी बंधू म्हणूनच पुजा करतील. तुझ्या सर्व जातिबांधवांना अत्यंत सन्मानाने वागवले जाईल. देव, दानव, यक्ष, किन्नर व चारी वर्ण आणि सर्व जाती जमाती या सर्वांना तुझ्याच हाताने पावित्र्य लाभेल. मग शंकर आणि विष्णूच्या या विनंतीनुसार शेषनागाने भगवान शंकराच्या नाभीतून मनुष्यरुपाने जन्म घेतला. नाभीच्या कुंडलिनीतून त्याचा जन्म झाला म्हणून त्याचे गोत्र कौडिण्य झाले आणि शेषाचा अवतार असलेला, शंकराच्या नाभीतून जन्म घेतला म्हणून त्यास नाभिक हे नाम प्राप्त झाले.

नाभिकाचा जन्म झाला खरा, पण ब्रह्माची मुंज करण्यासाठी क्षुरा म्हणजेच हत्यार नको का ? तेव्हा शंकराने आपल्या अंत:करणातील पाचव्या सूक्ष्म वेदाला पाचारण केले व त्यापासून तात्काळ मंत्रमय क्षुरा तयार केला. हे झाले नाभिकाचे हत्यार. त्यानंतर या हत्याराच्या साहाय्याने नाभिकाने ब्रह्माची शेंडी राखली व त्यानंतर ब्रह्मदेवाचे मौजीबंधन संपन्न झाले.

अशा रितीने नाभिक पुराण या ग्रंथानुसार शेषनाग हा नाभिक समाजाचा पूर्वज ठरतो. त्यामुळे नागपंचमी हा सण नाभिक समाजासाठी पवित्र मानला जातो म्हणूनच या दिवशी ते आपली दैनंदिन कामे बंद ठेवून नागाची पूजा करतात व आपल्या पूर्वजाचे स्मरण करतात.


**संकलक/लेखक : प्रा.एस खंडागळे पाटोदा (मो.९६५७२८४४४)**

# आरोग्यसेवा तेवत ठेवणारा रुग्णसेवक शरद झोडगे !!



प्रतिनिधी - वडवणी तालुक्यातील पुसरा या ठिकाणी अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये जन्मात आलेले व्यक्तिमत्व लहानपणापासूनच समाजकार्याची आवड, शरद झोडगे हे नाव आपल्याला विविध सामाजिक कार्याच्या माध्यमातून अनेक वेळा ऐकण्यात येते,अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेला हा मुलगा गेले अनेक वर्ष वेगवेगळ्या प्रकारच्या समाजकार्या मध्ये सदैव अग्रेसर असतो. शरद झोडगे हा वयाच्या 23 या वर्षी ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आला.रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रुग्णसेवक शरद झोडगे ,गेल्या अनेक वर्षांपासून गरजू रुग्णांसाठी आशेचे किरण असलेले शरद झोडगे हे रुग्णांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तत्पर असतात, कोविडच्या काळात त्याची उल्लेखनीय कामगिरी आहे,कोविड काळात कोणाला बेड भेटत नव्हता त्याला बेड उपलब्ध करून देण्यात आला, तसेच सर्व हॉटेल बंद असताना ज्यांचे उपजीविका भागत नव्हती त्यांनी स्वतः मित्र कंपनीसोबत घेऊन खिचडी वगैरे बनवून वाटप करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, रस्त्यावर फूटपाथवर बेघर लोकांना दिवाळी फराळ वाटप,तसेच महापुरुषांची जयंती व पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,रक्तदान शिबिर, अन्नदान,मोफत आरोग्य तपासणी शिबिर, गरजू रुग्णांना योजनेमध्ये ऑपरेशन करून देणे,मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ मिळवून देणे अशा अनेक प्रकारच्या समाजकार्यात सदैव अग्रेसर असतात, आरोग्य क्षेत्राच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्यदुत बाजीराव दादा चव्हाण साहेब यांनी रुग्णसेवक शरद झोडगे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड केली, जिल्हा रुग्णालय असो वा खाजगी रुग्णालय असो जवळपास दिवसाचा दोन ते तीन तास वेळ हे हॉस्पिटलमध्ये घालवतात व रुग्णांच्या अडीअडचणी जाणून घेतात व त्यांना सोडवण्याचा प्रयत्न करतात. आशा सामाजिक व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना १)आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडल समाजरत्न पुरस्कार पुणे येथील संस्थेने दिला आहे तसेच बार्शी येथे २) राज्यस्तरीय व्यसनमुक्ती गौरव पुरस्कार देखील देण्यात आला आहे तसेच कोविड काळात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ३) कोविड योद्धा पुरस्काराने देखील अनेक वेळा सन्मानित करण्यात आलेले आहे तसेच रयत सामाजिक प्रतिष्ठान बीड व जन्मभूमी सामाजिक प्रतिष्ठान रामगाव याही संस्थेने त्यांना पुरस्कार दिलेला आहे. त्यांचा स्वतःचा वाढदिवस सुद्धा दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम घेऊन मित्र परिवाराच्या वतीने साजरा केला जातो असा या आदर्श व्यक्तिमत्वास वाढदिवसाच्या हार्दिक ..

# लोककलेची परंपरा जोपासणाऱ्या टिपरे महोत्सवासाठी गेवराई सज्ज




गेवराई। प्रतिनिधी गेवराई शहराला टिपरे आणि सोंग या लोककलेची सुमारे शंभर वर्षाची परंपरा लाभली आहे. या लोककलेची परंपरा जोपासण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातुन दरवर्षी नागपंचमीच्या निमित्ताने भव्य टिपरे महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं. ६ वा. बाजार तळ, गेवराई येथे टिपरे महोत्सवाचे आयोजन केले असुन या निमित्ताने होणार्या स्पर्धांमध्ये सहभागी होवुन टिपरे महोत्सव यशस्वी करण्याची आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे खर्या अर्थाने या लोककलेला राजाश्रय मिळाला आहे. गेवराई शहरातील गल्लो-गल्लीमध्ये सध्या टिपर्यांचा सराव होतांना दिसत आहे, शंभर वर्षांची परंपरा लाभलेली ही लोककला मधल्या काळात लोप पावत होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या लोककलेला राजाश्रय देवुन ती परंपरा जोपासण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सुमारे १ लाख २७ हजार रुपयांची रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह देवुन त्यांनी स्पर्धात्मक दृष्टीकोणातुन या कलेला नवसंजवणी देण्याचा प्रयत्न केला आहे. बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं. ६ वा. बाजार तळ, गेवराई येथे यावर्षी टिपरे महोत्सवाचे आयोजन केले आहे. महिलांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेवुन त्यांच्यासाठी वेगळी बैठक व्यवस्था या निमित्ताने करण्यात आली आहे. दरवर्षी या महोत्सवाला प्रेक्षकांचा विशेषत: महिलांचा प्रतिसाद वाढत आहे. यावर्षीचा टिपरे महोत्सव यशस्वी करण्यासाठी टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेत जास्तित जास्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. तसेच सर्व विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

# ३५ किलोचे कोथिंबीर गाठोडे शंभर रुपयात; भाव न मिळाल्याने फिरवला कोथिंबिरीवर रोटर

माजलगाव-प्रतिनिधी शेतकऱ्यांच्या कथा आणि व्यथा सर्वांना ठाऊक आहेत, काबाडकष्ट करून एक एकर पाच गु ंठे शेतीमध्ये कोंथिबीरीचे पीक घेतले. चार पैसे हाताशी येतील आणि आपल्या चिल्या पिल्यांची शाळा ,कपड े ,किराणा आदींचा खर्च निघेल या आशेने जिवापाड जपलेल्या कोंथिबीरीला बाजारात योग्य भाव न मिळाल्याने एका शेतकऱ्याने एक एकर पाच गु ंठे कोंथिबीरवर रोटर फिरवल्याची घटना माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथे घडली आहे. एरव्ही भाजपला थोडा महाग झाल की लगेच भाजीपाल्याचे भाव गगनाला भिडले म्हणून बोंब माराणाऱ्यांनो आता आहे का उमच्या कडे उत्तर ! सदरील घटनेची माहिती अशी की, तालुक्यातील मोठ ेवडी येथील नाथाराव किनोळकर हे येथील अल्पभूधारक शेतकरी आहेत. ते दिवस रात्र शेतीत राब राब राबतात, त्या पिकास विविध खते, अत्याधुनिक औषधी आणि फवारणीचा वापर करून चाळीस दिवस त्याची निगा राखली. बाजार बिटात कोंथिबीरीचे ३५ किलोचे गाठोडे शंभर रुपयात मागीतले. कोंथिबीरीचे भाव पडल्याचे लक्षात येताच शेतात केलेली मेहनत आणि त्यासाठी केलेला २५ हजार रुपये खर्च निघणार नाही, मजुरीचे पैसेही निघेनात , शेवटी नाईलाजाने शेतकरी नाथाराव किनोळकर यांनी आपल्या कोथिंबीरीच्या उभ्या पिकावरच थेट रोटर फिरवला आहे. दिवसेंदिवस शेती करणे अवघड होत चालले असुन महागाईच्या बडग्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही, बाजारभाव नाही, नुकसान भरपाई वेळेत व विमा संरक्षण नाही त्यामुळे शेतकऱ्याला वालीच उरला नाही, कधी अस्मानी संकट तर कधी सुलतानी (राजकीय) संकट यांच्यात संपूर्ण शेतकरी पिचला गेला आहे अशी परिस्थिती झाली असल्याचे शेतकरी नाथाराव किनोळकर यांनी सांगितले. प्रशासनाने अशा पद्धतीने होत असलेल्या नुकसानीचा आढावा घेऊन, याबाबत शेतकऱ्यांसाठी काही करता येते का हे पाहायला पाहिजे, असे मत परिसरातील शेतकरी व्यक्त करत आहेत. तर एरव्ही बाजारात गेल्यावर भाजीपाला महाग झाला म्हणून बोंब माराणाऱ्यानो आता आहे का तुमच्या कडे या प्रश्नाचे उत्तर

# अल्पवयीन मुलीला झाडाला अज्ञात व्यक्तिनी बांधून ठेवले पोलीस तातडीने घटनास्थळी जाऊन मुलीची केली सुटका

शिरूर कासार : तालुक्यात शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास शौचविधिसाठी बाहेर पडलेल्या एका सतरा वर्षीय मुलीस अज्ञात ईसमांनी जवळच्या वनविभागाच्य हद्दीतील शेतात नेऊन झाडाला बांधून टाकले ,मुलगी येण्यास उशिर का झाला म्हणून आई शोध घेताना झाडाला बांधलेल्या मुलीला पाहून तीने आरडा ओरड केली तसेच तातडीने घटनेबाबत पोलीसाना कळवले ,पोलीस तातडीने घटनास्थळी जाऊन डांबुन ठेवलेल्या मुलीची सुटका केल्याची घटना घडली या प्रकरणी मुलीच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला असुन पुढील अधिकचा तपास पोलीस करत आहे . दिलेल्या फिर्यादीत अल्पवयीन मुलगी शनिवारी साडेदहाच्या सुमारास शौचविधीसाठी बाहेर पडली असता अज्ञात दोघानी तिच्या तोंडावर काही तरी स्प्रेसारखे फवारले ,डोळ्याला अंधा-या आलेसारखे झाले असता त्यानी साधारण घरापासुन दोनशे मिटरवर ओढत नेले व झाडाला बांधून टाकले ,आई शोध घेत आली असता ते पसार झाले आईने आरडाओरड केली नंतर ही खबर पोलीसांना दिली तातडीने पोलीस घटनास्थळी हजर झाले व मला सोडले अशा आशयाची फिर्याद दिली . घटनेचे गांभिर्य ओळखुन शिरूर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकिय तपासणी करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले ,मुलीच्या फिर्यादीवरुण पोलीसांनी पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला ,पुढील अधिकचा तपास वसंत जायभाये हे करत असुन त्यासाठी स्वतंत्र पथक नेमले असल्याची माहिती स.पो. नि.यांनी दिली आहे .लवकरच या घटनेबाबत सत्यता उघडकीस आणली जाईल असेही सांगण्यात आले .

# नांदेडच्या एकाच अपिलार्थीचे ८१ अपील राज्य माहिती आयोगाने फेटाळले

## 19 अपिलार्थींचे 7 हजार 567 व्दितीय अपील फेटाळले

बीड, 28 जुलै (जिमाका) :- नांदेड येथील जनक रामराव गायकवाड या अपिलार्थीने राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल केलेले 81 द्वितीय अपील आयोगाने फेटाळले आहेत. यासोबतच 19 अपिलार्थींनी दाखल केलेले 7 हजार 567 व्दितीय अपील आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळले आहेत.

अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे 81 माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील नमूद अपिलार्थी यांची द्वितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

बहुतांश अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी जेवढ्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केले त्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पदनिर्देशित आहेत. मात्र अशा सर्व जन माहिती अधिकारी यांचेसाठी केवळ एकच प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित आहेत. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. या परिस्थितीत दैनदिन कामकाज सांभाळून अपिलाची यांच्या दाखल प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम 7 (9) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे 81 माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत या अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये, प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे, त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्थान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

पुढील अपीलार्थीची आयोगाने द्वितीय सुनावनी घेवून अपीले फेटाळली आहेत. केशवराव निंबाळकर यांची आयोगाकडे दाखल 2788 द्वितीय अपिले 26 जुन 2024 तर 842 द्वितीय अपिले 19 डिसेंबर, 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. शरद दाभाडे यांची 159 द्वितीय अपिले 26 एप्रिल, 2024 तर 985 द्वितीय अपिले 27 सप्टेंबर, 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मोतीराम गयबु काळे यांची आयोगाकडे दाखल 463 द्वितीय अपिले 23 सप्टेंबर, 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाळासाहेब भास्कर बनसोडे यांची आयोगाकडे दाखल 256 द्वितीय अपिले 20 डिसेंबर, 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. श्रीमती अनिता नितीन वानखेडे यांची आयोगाकडे दाखल 116 द्वितीय अपिले 06 सप्टेंबर 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाबुराव धोंडु चव्हाण यांची आयोगाकडे दाखल 198 द्वितीय अपिले 20 जानेवारी 2025 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. जयभीम नरसिंगराव सोनकांबळे यांची आयोगाकडे दाखल 176 द्वितीय अपिले 01 ऑक्टोबर 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. हरि प्रताप गिरी यांची आयोगाकडे दाखल 296 द्वितीय अपिले 28 ऑगस्ट 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. विनोदकुमार भारुका यांची आयोगाकडे दाखल 236 द्वितीय अपिले 28 ऑगस्ट 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. गिरीश म. यादव यांची आयोगाकडे दाखल 206 द्वितीय अपिले 23 ऑगस्ट 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. संजय हाबु राठोड यांची आयोगाकडे दाखल 100 द्वितीय अपिले 30 ऑगस्ट 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. रायभान किसन उघडे यांची आयोगाकडे दाखल 216 द्वितीय अपिले 30 सप्टेंबर 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बालाजी बळीराम बंडे यांची आयोगाकडे दाखल 156 द्वितीय अपिले 01 ऑक्टोबर 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. भालचंद्र साळुंके यांची आयोगाकडे दाखल 103 द्वितीय अपिले 24 जानेवारी 2025 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मिलिंद दगडु मकासरे यांची आयोगाकडे दाखल 125 द्वितीय अपिले 30 ऑगस्ट 2024 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. ज्ञानेश्वर धायगुडे यांची आयोगाकडे दाखल 86 द्वितीय अपिले 24 जानेवारी 2025 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. सुरज नंदकिशोर व्यास यांची आयोगाकडे दाखल 63 द्वितीय अपिले 24 जानेवारी 2025 रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत.

# सा.आम्ही मुंबईकर या सामाजिक कला, साहित्य वृत्तपत्रातर्फे सर्व सदस्यांना, पत्रकारांना, बातमीदारांना सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार -२०२५

मुंबई प्रतिनिधी - भारत कवितके रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११वाजता जोगेश्वरी पूर्व जुनी अस्मिता शाळा , श्री कृष्ण नगर, श्री कृष्ण मंदिर शेजारी ,मनपा ट्रामा रुग्णालय बांदेकर वाडी येथे प्रथम मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले, स्वागत गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली, प्रमुख पाहुण्यांचा परिचय सत्कार सोहळा पार पडला, या वेळी प्रमुख पाहुणे पाठ्यपुस्तकातील ग्रामीण कवी श्री राम घडे यांनी सांगितले की,माझी पहिली कविता साप्ताहिक आम्ही मुंबईकर मध्ये छापून आली तेव्हा पासून मी कविता लिहीत गेलो, संपादक प्रमोद सूर्यवंशी यांचा मी यामुळे आभारी आहे," सागर देशमुख सरांनी आपण चित्रपटांमध्ये लहान बालकांना घेऊन त्यांना प्रोत्साहन देऊ शकतो," साप्ताहिक आम्ही मुंबईकर च्या उपसंपादिका वसुधा नाईक म्हणाल्या की " रमाची पाटी या चित्रपटाचे मी लेखन केले त्यास १०० हून अधिक पुरस्कार मिळाले, शिक्षिका असल्याने मी बालगीता मधून मुलांचे मनोरंजन केले आहे कोरोना काळात आई वडील गेले अशा मुलांना मदत करते,२८ मुलांना दिपावलीच्या सणात कपडे दिले,पण मी प्रत्यक्ष आर्थिक मदत करीत नाही,कारण ती गरजू पर्यंत पोहचत नाही,मी कोणतीही नवीन संधी सोडत नाही . संपादक प्रमोद सूर्यवंशी यांच्या बरोबर साप्ताहिक आम्ही मुंबईकर चे लावलेले रोपटे वटवृक्ष झाल्याचे समाधान आहे," संपादक प्रमोद सूर्यवंशी यांनी सांगितले की" साहित्यिक मित्रांमुळेच आम्ही आम्ही मुंबईकर साप्ताहिक काढू शकलो, साहित्यिकांना वाव मिळावा म्हणून.प्रचंड प्रतिसाद मिळत गेला, मागणी



व नोंदणी वाढत गेली, आठवड्यातून दोनदा अंक काढावा लागतो आहे, आता दैनिक व्हावा अशी मागणी होत आहे."या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक व अभिनेते अजय बिरारी मार्गदर्शन करताना म्हणाले की " तुम्ही पुरस्कारापर्यंत पोहचला म्हणजे तुम्ही तुमची कला आत्मसात केली आहे, कलाकार मला आपलासा वाटतो म्हणून मी त्यांच्यात जातो, व्हाट्सअप, फेसबुक वर दिलेली दाद खरी असतेच असे नाही, माझ्या साहित्याचा प्रवास थोडा उशीरच चालू झाला." या वेळी रज्जाक शेख यांनी अप्रतिम गजल गाऊन रसिकांची मने जिंकली, काही कवी कवयित्री यांना कविता सादर करण्याचा मोह आवरता आला नाही, सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात जल्लोषात संपन्न झाला,या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सुचित्रा कुंचमवार व श्री शैल सुतार यांनी खुमखुमीत मनोरंजनात्मक अभ्यास पूर्ण केले.शेवटी गौरव पुंडे यांनी आभार मानले, या प्रसंगी भारत कवितके, संजय पाटील,हिंगणकर महाराज, सुरेखा पाटील, नमाई सुभाष नाईक, जयराम मांजरे - पाटील , सुरक्षा पाटील, जयश्री बोरसे, गीतांजली वाणी , आशा ब्राह्मणे, किशोरी पाटील, योगिता कोठेकर योगिता जाधव, संजय डुबल, गणेश हिरवे ,लक्ष्मण शिवणेकर, मारुती नलावडे बाळासाहेब तोरसकर , सविता जगताप, संतोष यादव, रज्जाक शेख व इतर पुरुष व महिला पुरस्कार्थी उपस्थित होते, सर्वांनी संपादक प्रमोद सूर्यवंशी,उपसंपादक वसुधा नाईक,ग्राफिक्स डिझाईनर अंगद दराडे यांचे आभार मानले. आयोजक , गौरव पुंडे,योगेश हरणे, महेश सोनवणे, रेखा हरियाण मॅडम यांनी उत्तम सहकार्य केले. खास आकर्षण ठरली कार्यक्रमात आज ज्यू चार्ली ( सोमनाथ स्वभावाने ), राजश्री देशमुख ( कोस्ट्युम डिझायनर, स्वरा कदम ( बाल कलाकार ) यांच्या आगमनामुळे आणखी कार्यक्रमाची शोभा वाढली.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर




# माणिकराव कोकाटेंना अभय?

## अजितदादांच्या विधानानं वेगवेगळ्या चर्चांना उधाण!

पावसाळी अधिवेशन चालू असताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात ऑनलाईन रमी खेळताना दिसले होते. त्यांच्या या कृतीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. दरम्यान, सभागृहात अत्यंत महत्त्वाच्या विषयावर चर्चा होत असताना ऑनलाईन जुगार खेळणे चूक आहे, असे म्हणत विरोधकांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मी त्यांच्याशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेईल, अशी भूमिका घेतली होती. आता मात्र अजित पवार यांनी केलेल्या विधानामुळे माणिकराव कोकाटे यांना अभय मिळालं आहे का? असा सवाल उपस्थित केला जातोय.

अजित पवार यांनी माझी आणि कोकाटे यांची 28 किंवा 29 जुलै रोजी भेट होईल. या भेटीत सभागृहात घडलेला प्रकार नेमका काय आहे? याबाब मी त्यांना विचारेन. त्यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येईल, असे याआधी अजित पवार यांनी सांगितले होते. चर्चा करेन आणि नंतर निर्णय घेईल माणिकराव कोकाटे यांच्याकडून मागे अशीच गोष्ट घडून गेली होती. त्याची मी दखल घेत असं होता कामा नये, असे सांगितले होते. तशीच चूक



दुसऱ्यांदा घडली. तेव्हाही मी त्यांना जाणीव करून दिली की दोन वेळा झालं आता तिसऱ्यांदा तशी वेळ येऊ देऊ नका, असं मी त्यांना सांगितलं होतं. आता नव्या प्रकरणात मी रमी खेळतच नव्हतो, असे कोकाटे सांगत आहेत. त्यामुळे त्याचा तपास होईल आणि लवकरच सत्य काय ते समोर येईल. मी सोमवारी किंवा मंगळवारी कोकाटे यांना बोलवून त्यांच्याशी चर्चा करेन आणि नंतर निर्णय घेईल, असे अजित पवार यांनी 24 जुलै रोजी सांगितले होते. मी निर्णय घेईल तेव्हा तो जाहीर केला जाईल आता 27 जुलै रोजी मात्र अजित पवार यांनी कोकाटे यांच्या राजीनाम्याविषयी माध्यमांना सांगण्याचे काही कारण नाही. ज्यावेळी मी निर्णय घेईल तेव्हा तो जाहीर केला जाईल, असे अजित पवार म्हणाले. तसेच आमचे निर्णय काय व्हावेत हे राज्याचे मुख्यमंत्री आणि आम्ही ठरवू. तसेच मंत्रिमंडळात कोण असावं आणि कोण नसावं हे ठरवण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यामुळे तो त्यांचा अधिकार आहे, असे अजित पावर म्हणाले.

### असे अजित पवार यांनी सांगितले.

अजित पवार यांच्या याच विधानामुळे आता माणिकराव कोकाटे यांना अभय देण्यात आलंय की काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर दुसरीकडे अजित पवार यांनी 27 जुलै रोजीच एका सभेत बोलताना मी चुकीचं समर्थन करत नाही. माझ्यापुढे कोणी चूक केली तर मी कारवाई करणारा कार्यकर्ता आहे. मी तीन वेळा समजून सांगेन पण चौथ्यांदा मी समजून सांगत नाही, असंही म्हटलंय. त्यामुळे कोकाटे यांच्याबाबतीत नेमकं काय होणार? हे जाणून घेण्याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे.

## मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये तिरळेपणा येऊ शकतो-डॉ. मंजुश्री हंबर्डे-पवार

बीड (प्रतिनिधी) येथील संस्कार प्राथमिक विद्यालयात विशाखा समिती आणि सखी सावित्री समिती च्या वतीने आयोजित कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नांदेड येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ सौ. मंजुश्री हंबर्डे - पवार यांनी,मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये तिरळेपणा तसेच विविध डोळ्याचे विकार होऊ शकतात. असे मत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलतांना केले. पुढे त्या म्हणाल्या की,विद्यार्थ्यांचा आहार विहार व व्यायाम



यांचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असतो त्यामुळे त्यांनी घरचे आईच्या हातचे बनवलेले ताजे अन्न खावे . बाहेरचे फास्ट फूड खाणे कमी करावे .तणावामुळे आरोग्य खराब होते, यासाठी अभ्यासाचे नियोजन करून आपण आपल्या अभ्यासाचा तणाव कमी करू शकतो. तसेच दैनंदिन जीवनशैलीतील बदलामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी किमान रोज अर्धा तास व्यायाम करायला हवा . त्यांनी यावेळी बदलती जीवनशैली व त्याचे दुष्परिणाम या विषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कुलकर्णी एस .डी.या होत्या . याप्रसंगी व्यासपीठावर पाचवी ते सातवी विभागाचे विभागप्रमुख सुनील सोनवळकर , विशाखा समितीच्या सदस्य विद्यालयातील शिक्षिका मीना पिंपळे,यांची उपस्थिती होती.कार्यक्रमास उर्मिला बर्दापूरकर, वैशाली कुलथे,भाग्यश्री हिवरेकर,स्वाती राऊत,स्वाती धर्माधिकारी, अश्विनी थापडे,आरती राऊतमारे,स्वाती शेजाळ यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वनमाला स्वामी यांनी केले तर श्रीमती प्रतिभा डोईफोडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास पाचवी ते सातवी वर्गातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती होती .

## अनैतिक संबंधाच्या संशयावरून खून, मंठा पोलिसानं कडून दोन तासात आरोपीस अटक

तालुक्यातील केंधळी शिवारात विश्वलक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज नावाचा गट्टू बनविण्याचा कारखान्या जवळ निवृत्ती विनायक सवडे (रा. नांदखेडा, जाफराबाद) आणि मेहुणा गणेश समाधान अंभोरे हे आपल्या कुटुंबासह राहतात.याच कंपनीच्या समोरील रस्त्यावर श्रीपाद स्वामी जखमी अवस्थेत पडलेला असताना भगवान गडदे यांना आढळून आला.श्रीपाद स्वामी याला उपचारासाठी दवाखान्यात उपचारासाठी नेले असता डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. निवृत्ती सवडे आणि त्यांच्या मेहुणा गणेश अंभोरे यांना आलेल्या अनैतिक संबंधाच्या संशयातून त्यांच्या घराजवळ राहणाऱ्या श्रीपाद स्वामी (५५) या एकट्या राहणाऱ्या व्यक्तीस रात्री लाठ्या- काठ्यांनी बेदम मारहाण केली होती.त्यानंतर त्या दोघांनी स्वामी यास जालना येथे जिल्हा रुग्णालयात परस्पर दाखल केले होते.मात्र स्वामी याचा मृत्यू झाला होता.मात्र सवडे आणि अंभोरे यांनी स्वामींच्या मृत्यू कश्यामुळे झाला ? याचे कारण दडवून ठेवले होते. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असता निवृत्ती सवडे व गणेश अंभोरे यांनी गुन्हा कबूल केला असून पोलिसांनी अवघ्या दोन तासात आरोपीचा शोध घेत त्यांना ताब्यात घेतले आहे.

## फिरंगिमाता मंदिरा च्या परीसरात वृक्ष लागवाड



रोहिलागड ।प्रतिनिधी अंबड तालुक्यातील रोहिलागड गावातील फिरंगीमाताच्या परिसरात आज दि.२८/०७/२०२५ रोजी वृक्ष लागवड करणेत आले. किमान दोन शे ते चारशे विविध प्रकारचे वृक्ष लावनेत आले. वृक्ष लागवड करतानी उपस्थित ग्रामसेवक .तलाटी. सरपंच . रोजगार सेवक बाबासाहेब आप्पा टकले व गावकरी संदिप वैद्य गणेश टकले बाळु टकले गणेश थोटे कुष्णा टकले बालाजी पाटिल रंजीत जाधव दिपक जाधव सर हाणुमानभाऊ नारायण टकले बळीराम वैद्य सुरेश पाटिल ज्ञानेश्वर पाटिल गोपाल पाटिल

## तरुणांनी व्यसनापासुन दुर राहुन शिक्षणात गुणवत्ता संपादन करावी – मा.आ. भीमराव धोंडे

आष्टी ।प्रतिनिधी शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता व उच्च दर्जाची पात्रता निर्माण केली तर आजही सरकारी नोकरी मिळते. तरुणांनी व्यसनापासुन दुर राहुन शिक्षणावर भर दिला पाहिजे. गुणवत्ता असेल तर आजही नोकरी मिळते असे प्रतिपादन शेतकरी शिक्षण संस्थेचे संस्थाध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांना जी दूरदृष्टी होती तशीच दूरदृष्टी भीमराव धोंडे यांना लाभली. भीमराव धोंडे यांनी मतदार संघात कधी न संपणार काम केले आहे. शिक्षण संस्था सुरु करुन कधीही न पुसणार काम भीमराव धोंडे यांनी केलेले आहे



असे प्रतिपादन अहिल्यानगर जि. प. चे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस यांनी केले. आष्टी तालुक्यातील निमगावा बोडखा येथील श्री विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सेवानिवृत्त प्राचार्य माळशिकारे यांचा सेवापूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे होते. पुढे बोलताना धोंडे साहेबांनी सांगितले की, आपल्या संस्थेच्या तीन तालुक्यात मिळून ९६ युनिट आहेत. जेवढ्या प्रकारचे शिक्षण असेल तेवढ्या प्रकारचे शिक्षण मी आपल्या मतदारसंघात आणायचा प्रयत्न करणार आहे. तसेच आपण आपल्या मतदारसंघात पाचशे बेडचे कॅन्सर हॉस्पिटल लवकर सुरू करणारा असून या हॉस्पिटलमध्ये कॅन्सर ग्रस्त पेशंटचा मोफत उपचार करणार आहोत. आपल्या बीड जिल्ह्यात २२ हजार कॅन्सर ग्रस्त पेशंट असून शेजारील अहिल्यानगर जिल्ह्यात ४६ कॅन्सर ग्रस्त पेशंट आहेत. कॅन्सरचे प्रमाण खूप वाढत आहे. तरुणांनी व्यसनाधीन न होता शिक्षणाकडे वळले पाहिजे. ९६ युनिट आहेत. जेवढ्या प्रकारचे शिक्षण असेल तेवढ्या प्रकारचे शिक्षण मी आपल्या मतदारसंघात आणायचा प्रयत्न करणार आहे. तसेच आपण आपल्या मतदारसंघात पाचशे बेडचे कॅन्सर हॉस्पिटल लवकर सुरू करणारा असून या हॉस्पिटलमध्ये कॅन्सर ग्रस्त पेशंटचा मोफत उपचार करणार आहोत. आपल्या बीड जिल्ह्यात २२ हजार कॅन्सर ग्रस्त पेशंट असून शेजारील अहिल्यानगर जिल्ह्यात ४६ कॅन्सर ग्रस्त पेशंट आहेत

# मराठा सेवा संघाच्या वधू - वर कक्षाने परिचय मेळाव्यांची व्याप्ती वाढवावी - आ. सुरेश धस

आष्टी ।प्रतिनिधी समाजामध्ये विवाह जुळवणे अत्यंत अवघड काम झाले आहे. मध्यस्तांची संख्या कमी झाली. नात्यागोत्यामध्ये आपसात संवाद राहिला नाही. म्हणून वधू - वर परिचय मेळाव्यांची गरज भासू लागली आहे. मराठा सेवा संघाने आशा वधू - वर मेळाव्यांची व्याप्ती वाढवावी असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. आष्टी येथे आयोजित मराठा वधू - वर व परिचय मेळाव्याचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. पुढे बोलताना आ. धस म्हणाले की, मराठा समाजातील लोक विवाह समारंभावर प्रचंड खर्च करतात. हा खर्च कमी झाला पाहिजे. यासाठी सुद्धा मराठा सेवा संघाने पुढाकार घ्यावा. मध्यंतरीच्या काळामध्ये स्त्रीभ्रूणहत्या मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे मुलींची संख्या कमी झाली. त्याचा दुष्परिणाम आज समाज भोगत आहे. तरीसुद्धा उच्चशिक्षित मुलींची संख्या उच्चशिक्षित मुलांपेक्षा जास्त झाली आहे. त्यामुळे शेतकरी मुलांना मुली मिळत नाहीत. पण आता शेती विकणारांची संख्या कमी झाली आणि युवक शेती करणे पसंत करू लागले आहेत. तांत्रिक पद्धतीने शेती करणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. शेतीमध्ये नोकरीपेक्षा जास्त उत्पन्न मिळू लागले आहे. म्हणून शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार आहेत असेही ते म्हणाले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणामध्ये इंजि. तानाजी जंजिरे म्हणाले की, मराठा समाजाच्या विवाह विषयक अडचणी सोडवता याव्यात म्हणून सदरचा मेळावा आम्ही आयोजित केला आहे. यापुढ` लवकरच अंबाजोगाई, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, पुणे, शिर्डी आदी ठिकाणी मराठा समाजाची मोठे आणि भव्य असे मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये वृद्धेश्वर साखर कारखान्याचे कार्यकारी सल्लागार जे. आर. पवार साहेब म्हणाले की, मुला मुलींचे लग्न वेळेवर होत नसल्यामुळे समाजावर मोठे संकट येऊ घातले आहे. आपला मराठा समाजच अल्पसंख्याक समाज होण्याच्या मार्गावर आहे. पुढे ते म्हणाले की, काळाची गरज ओळखून आंतरजातीय विवाह करणे



सुद्धा गरजेचे आहे. यावेळी मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकजी ठाकरे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई माने, विभागीय उपाध्यक्ष सुवर्णाताई गिर्हे, बीड जिल्हाध्यक्ष संगीताताई शिंदे, प्राचार्य शशिकांत कन्हेरे, शिवाजी पाचे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन दिनेश पोकळे व प्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे यांनी केले. परिचय मेळाव्यामध्ये १०४ मुला - मुलींनी त्यांच्या पालकासह सहभाग नोंदवला. परिचय मेळाव्याचे सूत्रसंचालन डॉ. अशोक उढाणे, चेअरमन शिरीषभाऊ थोरवे व ज्येष्ठ पत्रकार विधिज्ञ सीताराम पोकळे यांनी केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी शिवश्री लक्ष्मण रेडेकर, शिवश्री भास्कर निंबाळकर, शिवश्री सुरेश पवार, विधिज्ञ शिवश्री संजय जगताप, शिवश्री दीपक पोकळे, शिवमती संगीता पोकळे, शिवश्री बन्सीधर मोरे, शिवश्री विशाल खंडागळे, शिवश्री प्रा. डॉ. दत्ता नरसाळे, शिवश्री ऋषिकेश खंडागळे, शिवश्री दीपक पोकळे, शिवमती जयश्री पोकळे आदींनी परिश्रम घेतले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com